# आवाहन पत्रक

दिनांक २९/०६/२०२०

## लॉकडाऊन काळात वाशिम जिल्हयात परतलेल्या युवक-युवतींना सुवर्ण संधी

जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केन्द्र, जिल्हाधिकारी कार्यालय परिसर, वाशिम येथे दिनांक २९/०६/२०२० रोजी सकाळी १०:०० वाजता Google Form Link चे उद्‌घाटन **मा. ना. श्री. शंभूराज देसाई, राज्यमंत्री, कौशल्य विकास व उद्योजकता विभाग** यांचे शुभहस्ते संपन्न झाले.

सद्यस्थितीत देशासह महाराष्ट्र राज्यात कोव्हिड-१९ विषाणूचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी जाहिर झालेल्या लॉकडाऊनमुळे वाशिम जिल्हयात साधारणत: ५५००० व्यक्ती परतलेले आहेत. लॉकडाऊनचा कालावधी संपल्यावरही जे युवक-युवती आपल्या जिल्हयात रोजगार/स्वयंरोजगार करण्यास इच्छुक असतील, अशा उमेदवारांना स्थानिक पातळीवर संधी उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे.

यासाठी या कार्यालयाने तयार केलेल्या Google Form Link च्या माध्यमातुन उमेदवारांचे आधार क्रमांक, शैक्षणिक / व्यवसायिक पात्रता, धारण केलेले कौशल्य, पुर्वीच्या कामाचा अनुभव, स्वयंरोजगार करणेबाबत इच्छुकता. इत्यादी (ऐच्छीक व अनिवार्य) मुद्दयाची माहिती संकलीत करणे अपेक्षीत आहे. सदर संकलीत माहितीच्या आधारे त्यांना कौशल्य विकास व उद्योजकता विभागाच्या www.mahaswayam.gov.in या संकेतस्थळावरील उपलब्ध सुविधांची माहिती देण्यात येईल.

यास्तव लॉकडाऊन काळात वाशिम जिल्हयात आपापल्या गावी परतलेल्या १५ ते ४५ वयोगटातील युवक-युवतींनी **सदर Google Form भरणेसाठी 9665525651 या व्हॉटस्ॲप क्रमांकावर Link प्राप्त करुन घेणेकरीता Request पाठवावी,** जेणेकरुन संबंधीतांना Google Form पाठविण्यात येईल व त्यामध्ये आवश्यक माहिती Submit करता येईल, असे आवाहन सहाय्यक आयुक्त श्रीमती सुनंदा बजाज यांनी केले आहे.

**(सुनंदा बजाज)**
**सहाय्यक आयुक्त**
**जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व**
**उद्योजकता मार्गदर्शन केन्द्र, वाशिम**